# खुलासा

या कार्यालयास प्राप्त ई–मेल, भ्रमणध्वनीवरील संदेश व प्रसिद्धी माध्यमातील बातम्यांनुसार बालभारतीमार्फत खुलासा करण्यात येतो, की बालभारतीच्या नावाने गेले काही दिवस राज्यातील पालकांना फोन केले जात असल्याबाबत या कार्यालयास तक्रारी प्राप्त होत आहेत. तशा आशयाचे वृत्त दिनांक ५.११.२०२४ रोजीच्या महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्रातून देखील प्रसिद्ध झाले आहे. दूरध्वनीवरील व्यक्ती पालकांना फोन करून 'आम्ही बालभारतीमधून बोलत असून आम्हास तुमचा संपर्क क्रमांक शाळेतून मिळाला आहे, आम्ही घरी भेट देऊन गुणांप्रमाणे तुमच्या पाल्याचे शैक्षणिक मूल्यमापन करून त्याला शैक्षणिक सल्ले देणार आहोत' असे सांगितले जात आहे.

याबाबत राज्यातील पालक/विद्यार्थी यांना आवाहन करण्यात येते, की बालभारती, पुणे या कार्यालयाकडून अशी कोणतीही कार्यवाही केली जात नाही वा कोणासही याबाबत या कार्यालयाने प्राधिकृत देखील केलेले नाही. या प्रकारात बालभारतीचे नाव वापरून पालकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यमापन करण्यासाठी बालभारतीने कोणत्याही कोचिंग क्लासेसशी अथवा शैक्षणिक संस्थेशी करार केलेला नाही. त्यामुळे या अनुषंगाने बालभारतीच्या नावाने फोन आल्यास पालकांनी त्यावर विश्वास ठेवू नये. तसेच याबाबत कोणाची तक्रार असल्यास बालभारती कार्यालयास pa_director@ebalbharati.in या मेलवर किंवा ०२०–२५७१६१३२ या क्रमांकावर संपर्क करून आपली तक्रार असल्यास ती नोंदवावी. या प्रकरणी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ तथा बालभारतीच्या वतीने पोलिसांच्या सायबर शाखेकडे तक्रार दिली असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

**संचालक,**
पाठ्यपुस्तक मंडळ,
बालभारती, पुणे
(यांच्याकरिता)